ePaper

**मोदींच्या दौऱ्यामुळे पुण्यात उद्या शाळांना सुट्टी? रस्तेही सकाळीपासूनच बंद!**



| वर्ष - 7 | अंक - 87 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 31 जुलै 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत


- अल-हिलालचा प्रस्ताव धुडकावला!
- सनी देओल रडला
- भाजप सत्तेसाठी देशही जाळू शकते
- शरद पवारांचा तिसरा प्लॅन


# विकास अन् दूरदृष्टीची 'मन की बात'!

## » भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांचे मत : सर्व शक्तीकेंद्र, बूथनिहाय कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण

| पिंपरी | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचा लोकप्रिय कार्यक्रम 'मन की बात' पिंपरी-चिंचवड शहरामध्ये उत्साहात झाला. शहरातील शक्तिकेंद्र आणि मंडलनिहाय या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते यामध्ये सहभागी झाले. देशाच्या विकासात्मक वाटचालीची आणि दूरदृष्टीची 'मन की बात' ही दिशादर्शक आहे, असे मत भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी व्यक्त केले.**



> हुतात्मा झालेल्या वीरांना आणि वीरांगनांना आदरांजली देण्यासाठी 'मेरी माती मेरा देश अभियान' - 'माझी माती माझा देश' ही मोहीम सुरू होणार आहे. या मोहिमे अंतर्गत देशभरात आपल्या अमर हुतात्म्यांच्या स्मरणार्थ अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा संकल्प पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला आहे. पिंपरी-चिंचवड हे क्रांतीवीर चापेकर बंधुंचे जन्मस्थळ म्हणून ओळखले जाते. त्यामुळे शहरातही 'माझी माती माझा देश' हे अभियान राबवण्याचा संकल्प आहे. त्यासंदर्भात पक्षश्रेष्ठी आणि भाजपा परिवारासोबत चर्चा करुन सकारात्मक पुढाकार घेणार आहे.
> – **शंकर जगताप,** भाजपा, पिंपरी-चिंचवड.

सांगवी येथे झालेल्या 'मन की बात' थेट प्रक्षेपण कार्यक्रमात शहराध्यक्ष शंकर जगताप सहभागी झाले. तसेच, या ठिकाणी पिंपरी-चिंचवड शहर भाजपाची 'टिफीन बैठक' ही झाली. आगामी काळात पक्षाची ध्येय धोरणे, कल्याणकारी योजना आणि ऐतिहासिक निर्णयांचे महत्त्व शहरातील नागरिकांपर्यंत पोहोचवण्याबाबत पदाधिकारी, शक्तिकेंद्र प्रमुख आणि कार्यकर्त्यांना आवाहन केले. यावेळी प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

रावेत- किवळे येथे झालेल्या 'मन की बात' हा कार्यक्रमात सचिन राऊत, बाळासाहेब ओव्हाळ, राजेंद्र गावडे, सुरेश भोईर, योगेश चिंचवडे, मधुकर बच्चे, प्रशांत अगज्ञान, तानाजी बारणे, अमोल बागुल, सन्नी बारणे, अभिषेक बारणे, संकेत चोंधे, संदीप कस्पटे, विनायक गायकवाड, प्रसाद कस्पटे, संदीप नखाते, गोपाळ माळेकर, सागर आंगोळकर, शशिकांत कदम, उषाताई मुंढे, राजेंद्र राजापुरे, अंबरनाथ कांबळे, संतोष कांबळे, जवाहर ढोरे तसेच सर्व शक्तीकेंद्र आणि बुथस्तरावर हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

### तीर्थक्षेत्र विकासाला गती आणि रोजगार निर्मिती...

*» अंमली पदार्थांच्या समस्येचे कायमस्वरुपी उच्चाटन करण्यासाठी सर्वांनी संघटित होण्याची आवश्यकता आहे, असे आवाहन पंतप्रधान यांनी केले. 'नशा मुक्त भारत अभियान'च्या धर्तीवर पिंपरी-चिंचवडमध्ये व्यसनमुक्ती मोहीम राबवण्याबाबत आम्ही पुढाकार घेण्याचा संकल्प केला आहे. स्वातंत्र्याच्या 'अमृत महोत्सवा'च्या दरम्यान निर्माण झालेल्या ६० हजाराहून जास्त अमृत सरोवरांच्या परिसराची शान वाढली. या प्रमाणे पिंपरी-चिंचवडमधील नैसर्गिक तलाव पुनरुज्जीवन मोहीम हाती घेता येणार आहे. अयोध्या, मथुरा, उज्जैन यांसारख्या तीर्थक्षेत्रांना भेट देणाऱ्या भाविकांची संख्या वेगाने वाढत आहे. यातून लाखो गरीब लोकांना रोजगार मिळू लागला आहे. असेच, पिंपरी-चिंचवड शहरातील श्रीमान महासाधू मोरया गोसावी मंदिर, क्रांतीवीर चापेकर बंधू स्मारक यासह तीर्थक्षेत्रांच्या विकासाला गती देणे आणि रोजगार निर्मितीबाबत सकारात्मक भूमिका घेता येणार आहे, असे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी सांगितले.*

# पोलीस आयुक्तालयाला मिळेना 'निवारा'!

## » देहुतील जागेचा पर्याय प्रलंबित : नगरविकास विभागाची मंजुरी मिळेना

| पिंपरी | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय व मुख्यालयकरिता जागा आणि नवीन पोलीस स्टेशन करिता पद निर्मिती बाबतचा मुद्दा आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी विधिमंडळाच्या मुंबई येथील पावसाळी अधिवेशनात औचित्याच्या मुद्द्याद्वारे उपस्थित केला.**




पिंपरी-चिंचवड शहरासाठी १५ ऑगस्ट २०१८ रोजी स्वतंत्र पोलीस आयुक्तालयाची निर्मिती होऊनही मागील तीन वर्षात पोलीस आयुक्तालयाचा प्रशासकीय कामकाज चिंचवड येथील मनपाच्या शाळेच्या भाडेतत्वावरील इमारतीत अपुऱ्या जागेत सुरु आहे. आयुक्तालयाची जागा अपुरी असल्या कारणाने वाहतूक शाखा, गुन्हे शाखा, लेखा शाखा इ. शाखेचे कामकाज शहरातील विविध ठिकाणी भाडेतत्त्वावर घेतलेल्या अपुऱ्या जागेत सुरु आहे. पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या प्रशासकीय इमारतीकरिता चिखली गट नं ५५३ पैकी ३.३९ हेक्टर जागा हस्तांरित करण्याबाबत परिपूर्ण प्रस्ताव शासनाच्या नगरविकास विभागाकडे मंजुरीअभावी प्रलंबित आहे. पिंपरी-चिंचवड पोलीस मुख्यालायाकरिता विठ्ठलनगर, देहू येथील गट नं ९७ येथील २० हेक्टर जागा पोलीस मुख्यालयाकरिता हस्तांतरित करण्याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाकडे मागील तीन वर्षापासून मंजुरी अभावी प्रलंबित आहे.

# बाप्पाचे दर्शन ते मेट्रोचे लोकार्पण

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार सोहळ्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी १ ऑगस्ट रोजी पुण्यात येणार आहेत. या पुणे दौऱ्यात त्यांची विविध कार्येही नियोजित करण्यात आली आहेत. यामध्ये मेट्रोला हिरवा झेंडा दाखवणे, विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणीचाही समावेश आहे. पंतप्रधान कार्यालयाकडून ही माहिती देण्यात आली आहे.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी सकाळी ११ वाजता दगडूशेठ गणपती मंदिरात जाऊन दर्शन घेणार आहेत. तिथे पूजा-अर्चा केल्यानंतर सकाळी ११.४५ वाजता त्यांना लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. तर, १२.४५ मिनिटांनी मेट्रो रेल्वेला हिरवा झेंडा दाखवणार आहेत. मेट्रो १ च्या दोन मार्गिकांचे लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे.

फुगेवाडी स्थानक ते दिवाणी न्यायालय आणि गरवारे स्थानक ते रुबी हॉल क्लिनिक स्थानक या दोन मार्गिकांचे उद्घाटन करण्यात येणार आहे. २०१६ मध्ये पंतप्रधानांच्याच हस्ते या प्रकल्पाची पायाभरणी झाली होती. मेट्रो रेल्वेचे हे नवीन विभाग पुणे शहरातील शिवाजी नगर, दिवाणी न्यायालय, पुणे महानगरपालिका कार्यालय, पुणे आरटीओ आणि पुणे रेल्वे स्थानक यांसारखी महत्त्वाची ठिकाणे जोडतील. देशभरातील नागरिकांना आधुनिक आणि पर्यावरणस्नेही गतिमान शहरी वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देण्याच्या पंतप्रधानांच्या दृष्टीकोनाला साकार करण्याच्या दिशेने हे लोकार्पण एक महत्त्वाचे पाऊल आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्यापासून प्रेरणा घेत मेट्रो रेल्वे मार्गावरील काही मेट्रो स्थानकांची रचना करण्यात आली आहे. छत्रपती संभाजी उद्यान मेट्रो स्थानक आणि डेक्कन जिमखाना मेट्रो स्थानकांची रचना ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या मावळ्यांनी परिधान केलेल्या पगडीसारखी (मावळा पगडी) आहे. तसंच, शिवाजी नगर भूमिगत मेट्रो स्थानकाची रचना शिवाजी महाराजांनी बांधलेल्या किल्ल्याप्रमाणे आहे. राज्यातील विविध ठिकाणी पंतप्रधान आवास योजनेंतर्गत घरे देण्यात येत आहेत. त्यापार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेद्वारे बांधण्यात आलेली १२८० हून अधिक घरे पंतप्रधानांच्या हस्ते हस्तांतरीत करण्यात येणार आहेत.

पुणे महापालिकेने पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत बांधलेली २६५० हून अधिक घरे देखील पंतप्रधान हस्तांतरित करणार आहेत. त्यांनतर पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेद्वारे बांधण्यात येणाऱ्या सुमारे ११९० घरांची आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून बांधण्यात येणाऱ्या ६४०० हून अधिक घरांची पायाभरणी देखील पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे.

पंतप्रधान या पुरस्काराचे ४१ वे मानकरी असतील. हा पुरस्कार मिळालेल्या दिग्गजांमध्ये डॉक्टर शंकर दयाळ शर्मा, प्रणव मुखर्जी, अटल बिहारी वाजपेयी, इंदिरा गांधी, मनमोहन सिंग, एन आर नारायण मूर्ती, डॉ. ई. श्रीधरन या व्यक्तींचा समावेश आहे.



### वेस्ट टू एनर्जी मशिनचे उद्घाटन

» पंतप्रधान नरेंद्र मोदी वेस्ट टू एनर्जी मशिचे उद्घाटन करणार आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिका (पीसीएमसी) अंतर्गत कचऱ्यापासून ऊर्जा निर्माण करणाऱ्या (वेस्ट टू एनर्जी) संयंत्राची निर्मिती करण्यात आली आहे. सुमारे ३०० कोटी रुपये खर्चून विकसित करण्यात आलेल्या या संयंत्राच्या माध्यमातून दरवर्षी सुमारे २.५ लाख मेट्रिक टन कचरा वापरून वीज निर्मिती केली जाणार आहे.

# सौर ऊर्जा निर्मिती योजनेची अंमलबजावणी

## पुणे परिमंडळाला राष्ट्रीय स्तरावरील सहा पुरस्कार

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**छतावरील सौर ऊर्जा निर्मिती योजनेच्या अंमलबजावणीमध्ये केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत महावितरणला राष्ट्रीय स्तरावरील सहा पुरस्कारांनी रविवारी गौरवण्यात आले. पणजी (गोवा) येथील कार्यक्रमात गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्या हस्ते महावितरणचे संचालक (प्रकल्प) प्रसाद रेशमे, पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता राजेंद्र पवार यांनी पुरस्कार स्वीकारले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय नवीन व नवीकरणीय ऊर्जा राज्यमंत्री भगवंत खुबा उपस्थित होते.**

छतावरील सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी केंद्रीय नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय आणि ऑल इंडिया रिन्यूएबल एनर्जी असोसिएशनच्या (एआयआरईए) वतीने कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात छतावरील सौर ऊर्जा योजनेच्या सुलभ व लोकाभिमुख अंमलबजावणीमध्ये केलेल्या उल्लेखनीय कामांसाठी महावितरणचे संचालक (प्रकल्प) श्री. प्रसाद रेशमे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. योजनेसंबंधी उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल नाशिक परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. दीपक कुमठेकर, नागपूर परिमडंलाचे मुख्य अभियंता श्री. दिलीप दोडके, महावितरण विशेष प्रकल्प कक्षाचे मुख्य अभियंता श्री. चंद्रमणी मिश्रा, कार्यकारी अभियंता श्री. शरद बंड यांनाही पुरस्कार प्रदान करण्यात आले.

पुणे परिमंडल अंतर्गत छतावरील सौर ऊर्जा प्रकल्पांच्या जनजागरणासाठी सातत्याने विविध उपक्रम घेण्यात येत आहे. त्यासाठी उपकार्यकारी अभियंता डॉ. संतोष पटनी समन्वयक म्हणून काम पाहत आहे. दृकश्राव्य माहितीपट, प्रदर्शनी, सौर ऊर्जारथ, ग्राहकसंवाद मोहीम व माहितीपत्रकांचे वितरण, प्रात्यक्षिक, समाजमाध्यमे तसेच प्रसारमाध्यमांद्वारे योजनेबाबत प्रबोधन व जनजागरण सुरु आहे.

सौर योजनेच्या वेगवान व प्रभावी अंमलबजावणीसाठी पुणे परिमंडलातील अभियंता, तांत्रिक कर्मचाऱ्यांसह एजन्सीजच्या प्रतिनिधींना प्रशिक्षण देण्यात आले आहे. त्यामुळे पुणे परिमंडलामध्ये सध्या 10 हजार 200 पेक्षा अधिक ग्राहकांकडील 254 मेगावॅट क्षमतेचे छतावरील सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत.



### सांघिक कामगिरीचा गौरव

» तर आणखी 3 हजार 500 पेक्षा अधिक ग्राहकांकडे 96 मेगावॅट क्षमतेच्या सौर प्रकल्पांचे काम सुरु आहे. पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता राजेंद्र पवार म्हणाले,"छतावरील सौर ऊर्जा योजना अधिकाधिक लोकाभिमुख व वेगाने कार्यान्वित करण्यासाठी सातत्याने उपक्रम सुरु आहे. त्यासाठी राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार मिळाला हा पुणे परिमंडलाच्या सांघिक कामगिरीचा गौरव आहे,'.

# अग्निशमन दलाचे अनोखे रेस्क्यू ऑपरेशन

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

अग्निशमन दलाच्या नियंत्रण कक्षात कोंढवा, पारगे नगर, डिएसके सोसायटीच्या मागे असणाऱ्या ठिकाणाहून कॉल आला. कुठल्याही आपत्तीच्या परिस्थितीत धावून जाणारे अग्निशमन दल इथेही धावले आणि वेगळ्याच आपत्तीत अडकलेल्या दोन मुक्या प्राण्यांची सुखरूप सुटका झाली. या ठिकाणी डांबर असलेल्या ड्रममधे दोन श्वान अडकले होते. त्यांची सुटका करण्याकरिता अग्निशमन दलाची मदत मागितली असता तातडीने कोंढवा खुर्द येथील अग्निशमन वाहन रवाना करण्यात आले.

एका ड्रममधे मोठ्या प्रमाणात डांबर असून त्यामधे श्वानाची दोन पिल्ले अडकली असून त्यांना सुखरुप बाहेर काढण्याचे आव्हान जवानांपुढे होते. तसेच तेथील स्थानिकांनी उंच डोंगर भागावरुन टॅक्टरमधून हा ड्रम खाली आणला होता. वाईल्ड एनिमल्स अँन्ड स्नेक्स प्रोटेक्शन सोसायटीचे अध्यक्ष आनंद अडसुळ यांना संपर्क साधत त्यांचे दोन सदस्य ही त्याठिकाणी पोहोचले. जवानांनी शक्कल लढवत प्रथम त्या सर्व्हुलर सॉ हे अग्निशमन उपकरण वापरुन ड्रमचे दोन भाग केले. नंतर अग्निशमन वाहनातील विविध छोट्या बचाव साहित्यांचा उपयोग करुन तसेच तेलाचा वापर करुन सुमारे तासाभरात हळूहळू दोन्ही श्वानांची सुखरुप सुटका केली. या कामगिरीत कोंढवा खुर्द अग्निशमन केंद्रातील तांडेल निलेश लोणकर, वाहनचालक दिपक कचरे तसेच जवान रवि बारटक्के, सागर इंगळे, अनिकेत गोगावले, मनोज गायकवाड, संतोष माने आणि वाईल्ड एनिमल्स अँन्ड स्नेक्स प्रोटेक्शन सोसायटीचे सदस्य लक्ष्मण वाघमारे, संदेश रसाळ यांनी सहभाग घेतला. तसेच स्थानिक रहिवाशी प्रतिभा पवार यांनी अग्निशमन दलाकडे वेळीच माहिती देत मदत केल्याने अग्निशमन दल व प्राणी संस्था यांना श्वानाची सुटका वेळेवर करता आली.

# शिवराज्याभिषेक हिंदू अस्मितेचा अविष्कार!

## » डॉ. केदार फाळके : चिंचवडमध्ये चापेकर समितीचे व्याख्यान

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**“शिवराज्याभिषेकामुळे स्वराज्याला कायदेशीर स्वरूप प्राप्त झाले ” असे विचार युवा इतिहास संशोधक डॉ. केदार फाळके यांनी पुनरुत्थान समरसता गुरुकुलम, चिंचवडगाव येथे शनिवारी व्यक्त केले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक सोहळ्याला ३५० वर्षे पूर्ण होत असल्याचे औचित्य साधून क्रांतिवीर चापेकर स्मारक समितीने आयोजित केलेल्या ‘श्री शिवराज्याभिषेक : हिंदू अस्मितेचा आविष्कार’ या मार्गदर्शनपर व्याख्यानात डॉ. केदार फाळके बोलत होते.**



समितीचे अध्यक्ष पद्मश्री गिरीश प्रभुणे, कार्यवाह ॲड. सतिश गोरडे, सदस्य अशोक पारखी, डॉ. अनू गायकवाड, नितीन बारणे, शाहीर आसराम कसबे यांची प्रमुख उपस्थिती होती; तसेच क्रांतिवीर चापेकर स्मारक समिती संचालित शाळांमधील शिक्षकवृंदाची सभागृहात उपस्थिती होती.

याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज यांचे पायदळातील सरसेनापती येसाजी कंक यांचे चौदावे वंशज सिद्धार्थ कंक आणि आकाश कंक यांना स्मृतिचिन्ह, ग्रंथ आणि शाल प्रदान करून गौरविण्यात आले. तसेच उल्लेखनीय कार्याबद्दल विश्व हिंदू परिषद मातृशक्ती पुणे विभाग संयोजिका प्रिया रसाळ यांचा प्रातिनिधिक सत्कार करण्यात आला.

प्रतिमापूजन, प्रज्ञा फुलपगार यांनी गायलेले सांघिक पद्य, गुरुकुलम् मधील विद्यार्थ्यांचे शिवस्तवन आणि शाहीर आसराम कसबे यांनी सादर केलेल्या शिवगीताने कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. गिरीश प्रभुणे यांनी प्रास्ताविक केले. ॲड. सतिश गोरडे यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला. आरती शिवणीकर, अतुल आडे, गुरुकुलम् मधील शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी संयोजनात परिश्रम घेतले. प्रा. दिगंबर ढोकले यांनी सूत्रसंचालन केले आणि आभार मानले.

### शिवाजी महाराज सार्वभौम राजे...

» डॉ. केदार फाळके पुढे म्हणाले की, “संपूर्ण आयुष्यभर कोणत्याही सम्राटाचे मांडलिकत्व न पत्करणारे शिवाजी महाराज हे तत्कालीन सार्वभौम राजे होते. औरंगजेबाने हिंदुस्थानातील अनेक राजे – महाराजे यांना मांडलिक केले. पाचशे हिंदू मंदिरांची विटंबना केली. जिझिया कर लादला. हिंदूंवर अत्याचार केले. या विरोधात शिवाजीमहाराज यांनी स्वराज्याची स्थापना केली. पूर्वी कधीही रक्तपात झालेला नाही अशा दृष्टीने पावन, पवित्र रायगडावर आपले तख्त उभारले. शनिवार, दिनांक ०६ जून १६७४ रोजी ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी, शके १५९६ या तिथीला शिवराज्याभिषेक सोहळा संपन्न झाला. १९ मेपासून या सोहळ्याच्या विविध विधींचा प्रारंभ झाला होता. सर्वत्र यवनांचे राज्य असताना एक मराठा राजा सार्वभौम राजा झाला, ही जगाच्या दृष्टीने असामान्य बाब होती. शिवराज्याभिषेकामुळे हजारो वर्षांनी मुघल साम्राज्याला आव्हान देणारी गोष्ट साध्य झाली!” चित्रफितीच्या माध्यमातून डॉ. केदार फाळके यांनी शिवराज्याभिषेकाची अतिशय सविस्तर आणि अभ्यासपूर्ण माहिती दिली. शाहीर योगेश आणि कवी भूषण यांच्या कवनांचे सादरीकरण करून त्यांनी आपल्या व्याख्यानाचा समारोप केला.

# चिखली परिसरातील रस्त्यांचे होणार डांबरीकरण!

## » अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील : माजी नगरसेवक कुंदन गायकवाड यांची पाहणी

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या प्रभाग क्रमांक 1 मधील मोरेवस्ती, चिखली आदीसह विविध भागातील दुरवस्था असणाऱ्या रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचे आश्वासन पिंपरी-चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त 1 प्रदीप जांभळे-पाटील यांनी दिले आहे. पावसाळा संपल्यानंतर या भागात त्वरीत कामाला सुरूवात करण्यात येणार असून सध्या पावसाळ्यात तात्पुरत्या स्वरूपात खड्डे बुजविण्यात येणार असल्याची माहिती माजी नगरसेवक कुंदन गायकवाड यांनी दिली आहे.**




नागरिकांच्या वाढत्या तक्रारीनंतर आमदार महेश लांडगे यांच्या सूचनेने तसेच माजी नगरसेवक कुंदन गायकवाड यांच्या पाठपुराव्यामुळे संबंधीत भागात रविवारी (दि. 30) प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. या वेळी जांभळे-पाटील यांनी उपाययोजना करण्याबाबत आश्वासन दिले. या पाहणी वेळी स्थापत्य विभागाचे सह शहर अभियंता ज्ञानदेव जुंधारे, फ क्षेत्रीय कार्यालयाचे स्थापत्य विभागाचे कार्यकारी अभियंता विजयकुमार काळे, उप अभियंता विजय वाईकर, कनिष्ठ अभियंता प्रतीक भसारकर आदी उपस्थित होते. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या प्रभाग क्रमांक 1 मधील मोरेवस्ती, चिखली, पाटीलनगर, सोनवणे वस्ती रोड, शेलार वस्ती, रामदासनगर, टॉवर लाईन, साने चौक, चिंचेचा मळा, म्हेत्रे वस्ती, या ठिकाणी पावसामुळे रस्त्याची चाळण झाली आहे. या परिसरातील रस्ते खड्डेमय झाले आहेत. त्यामध्ये पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात साचत आहे. त्याचा परिसरातील नागरिकांना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

या बाबत नागरिक देखील सातत्याने संताप व्यक्त करत होते. तसेच लेखी तक्रारींचे गाऱ्हाणे मांडत होते.

त्या बाबत महापालिका प्रशासनाकडे पाठपुरावा केला. आमदार महेश लांडगे यांनी देखील योग्य सूचना केल्यानंतर महापालिका प्रशासनाचे अधिकारी पाहणीसाठी आले होते. त्यावेळी पुढील उपायोजन करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

या वेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांनी पावसाळा संपल्यानंतर रस्त्याचे डांबरीकरण करून देऊ असे आश्वासन दिले. तसेच सध्या तात्पुरत्या स्वरूपात खड्डे बुजविण्यात येतील असे आश्वासन या निमित्ताने दिले.

### आमदार महेश लांडगे यांची सूचना

» नागरिकांच्या सातत्याने तक्रारी येऊनही त्याकडे दुर्लक्ष होत होते. या बाबत भोसरी विधानसभेचे आमदार महेश लांडगे यांच्याकडे तक्रारींबाबत माहिती दिली. त्यावर आमदार लांडगे यांनी त्वरीत महापालिकेच्या स्थापत्य विभागाच्या अधिकाऱ्यांना उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. आमदार लांडगे यांच्या सूचनेनंतर महापालिका प्रशासनाने देखील आपल्या हालचाली वाढविल्या. त्वरीत संबंधीत ठिकाणी पाहणी करून उपाययोना करण्याचे आश्वासन दिले असल्याची माहिती माजी नगरसेवक कुंदन गायकवाड यांनी दिली.

# बोलघेवडे राजकारण; बोलके आकडे..




**देशात महाराष्ट्र हे वर्षानुवर्षे प्रगतिशील राज्य म्हणून ओळखले जायचे. अन्य राज्ये महाराष्ट्राचा आदर्श घेत असत. विकास कामांवर सर्वाधिक खर्च या राज्यात व्हायचा. विदेशी गुंतवणुकीत महाराष्ट्र अजूनही आघाडीवरील राज्य आहे. सुमारे सहा लाख कोटींच्या राज्याच्या अर्थसंकल्पाचे आकारमानही देशात सर्वाधिक आहे.**

यामुळे विकास कामांवर सर्वाधिक खर्च राज्यात होण्याची अपेक्षा स्वाभाविकच. पण २०२२-२३ या गेल्या आर्थिक वर्षांत विकास कामांवर खर्च करण्यात महाराष्ट्र पार मागे पडले.



केंद्र सरकारच्या वतीने 'बँक ऑफ बडोदा'ने राज्याच्या विकास कामांवरील खर्चाचा आढावा घेऊन अलीकडेच अहवाल प्रसिद्ध केला. विकास कामे किंवा भांडवली खर्च करणाऱ्या राज्यांच्या यादीत बिहार, झारखंड, ओडिशासारखी मागास राज्ये महाराष्ट्राच्या पुढे आहेत हे राज्यासाठी नक्कीच धक्कादायक आहे. सरकारला एक वर्ष पूर्ण झाल्याबद्दल स्वत:ची पाठ थोपटून घेणाऱ्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आत्मपरीक्षण करावे लागेल, अशी ही आकडेवारी आहे. गेल्या आर्थिक वर्षांत राज्याने विकास कामांसाठी ८३,५३० कोटींची तरतूद केली होती पण प्रत्यक्षात ६०,४९९ कोटी म्हणजेच ७२.४ टक्केच रक्कम खर्च झाली. शेजारील कर्नाटकने तरतुदीच्या १३० टक्के रक्कम खर्च केली होती. बिहारने ३१ हजार कोटींची तरतूद करून त्यापेक्षा अधिक रक्कम खर्च केली. कर्नाटक, बिहार, मध्य प्रदेश, गुजरात, तमिळनाडू, झारखंड, ओडिशासारखी राज्ये विकास कामांवर जास्तीत जास्त रक्कम खर्च करत असताना महाराष्ट्राला हे जमत कसे नाही?

'विकास कामांसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही,' अशी ग्वाही राज्यकर्त्यांकडून प्रत्येक सरकारी समारंभात दिली जाते. पण निधीचे वाटप करताना विकास कामांवरील खर्चात कपात केली जाते, हे गेल्या १५ ते २० वर्षांत वारंवार अनुभवास आले. सहाव्या आणि सातव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीमुळे राज्य सरकारचे कंबरडे पार मोडले ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. चालू आर्थिक वर्षांत ४ लाख ४९ हजार कोटींची महसुली जमा अपेक्षित धरण्यात आली असताना वेतन व निवृत्तिवेतनावर २ लाख १२ हजार कोटी म्हणजेच ४७ टक्के रक्कम खर्च होणार आहे. याशिवाय कर्जावरील व्याज फेडण्याकरिता ५१ हजार कोटी म्हणजेच ११ टक्के रक्कम खर्च होणार आहे. म्हणजे ५८.४६ टक्के खर्च असाच झाल्यावर विकास कामांना अधिकचा निधी मिळणे कठीणच. कर्ज काढून विकास करू, असे वित्तमंत्र्यांकडून सांगण्यात येत असले तरी सात लाख कोटी रुपयांचा कर्ज-बोजा व त्यावरील व्याज फेडण्याकरिता होणारी रक्कम लक्षात घेता, कर्ज किती काढायचे याचाही विचार करावा लागणारच. जमा होणाऱ्या प्रत्येक एक रुपयातील ११ ते १२ पैसे विकास कामांसाठी राखून ठेवले जातात. पण तेवढाही निधी राज्य सरकारला शक्य होत नाही. पूर, अतिवृष्टी, अवकाळी पाऊस, वादळी आदी नैसर्गिक आपत्तीचे राज्याच्या मागे शुक्लकाष्ठच लागले आहे.

शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईवर १० ते १५ हजार कोटी खर्च होतात. गेल्या वर्षी २५ राज्यांच्या विकास कामांवरील एकत्रित खर्च लक्षात घेतल्यास ७६.२ टक्के राष्ट्रीय सरासरी होती. पण तेवढाही खर्च करता आलेला नाही. महसुली खर्च वाढल्यानेच विकास कामांवर राज्य सरकारला खर्च करणे शक्य होत नसावे, असाही निष्कर्ष 'बँक ऑफ बरोडा'च्या अहवालात आहे. राज्य सकल उत्पन्नाच्या तुलनेत राज्यावरील कर्जाचे प्रमाण कमी असल्याने कर्ज काढण्याचा पर्याय उपलब्ध असल्याचे वित्तमंत्र्यांकडून नेहमी सांगण्यात येते. पण शेवटी व्याजाचा बोजा वाढत जातो. मुंबई, ठाणे वा नवी मुंबईतील पायाभूत सुविधांसाठी मुंबई महानगर क्षेत्रविकास प्राधिकरणाने खुल्या बाजारातून कर्ज उभारून लाखो कोटींची कामे सुरू केली असली तरी एकेकाळी 'दुभती गाय' असलेल्या एमएमआरडीएची आर्थिक परिस्थिती आता पूर्वीइतकी सक्षम राहिलेली नाही. विकास कामांवरील खर्चात राज्याने हात आखडता घेतल्यानेच केंद्राने अलीकडेच राज्यांना विकास कामे राबविण्यासाठी मंजूर केलेल्या ५६ हजार कोटींच्या निधीत महाराष्ट्राच्या वाटय़ाला काहीच निधी आलेला नाही. व्यवसाय सुलभता वा विकास कामांवरील खर्च या दोन मुद्दय़ांवर राज्यांच्या यादीत महाराष्ट्राची झालेली पीछेहाट गंभीर आहे.

## संपादकीय »

### लसलसते अंकुर हे...

***पाच लाख कोटी डॉलर्सची अर्थव्यवस्था करण्याचे लक्ष्य किमान तीन वर्षे पुढे जाईल हे सांगण्याऐवजी आता 'आपण पहिल्या तिनांत येऊ' असे सांगणे अधिक विश्वासार्ह..***

नवनवी मृगजळे शोधणे, नसली तर तयार करणे आणि त्याकडे जनतेस आकृष्ट करणे हे राजकारण्यांस करावेच लागते. त्यामुळे 'तिसऱ्या कार्यकालात पहिल्या तिनांत' ही नवी घोषणा देणाऱ्यास अजिबात बोल लावता येणार नाहीत. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणे आणि भारतीय अर्थव्यवस्थेस पाच लाख कोटी डॉलर्सची अर्थव्यवस्था करणे इत्यादी वायद्यांनंतर आता ही नवी घोषणा. ती केल्यापाठोपाठ चोवीस तासांच्या आत स्टेट बँक ऑफ इंडियाच्या अर्थतज्ज्ञानेही या घोषणेची वास्तविकता दाखवून दिली ते लांगूलचालन आहे, असे काहींस वाटेल. तसे ते असले तरी त्या बिचाऱ्यास दोष देता येणार नाही. तो सरकारी सेवक. जेथे वास्तव दर्शनाबाबत खासगी उद्योजकांची बोबडी बारमाही वळलेली असते तेथे सरकारी नोकरांस हसण्याचे कारण नाही. आणि तसेही स्टेट बँकेच्या अर्थतज्ज्ञाने व्यक्त केलेल्या अंदाजात काही गैर आहे; असेही नाही.

**भारताचं स्वातंत्र्य, स्त्रियांच्या डोक्यावरचं कुंकू आणि आता महात्मा गांधी अशा विषयावर वादग्रस्त विधानं करणाऱ्या संभीजी भिडेंना आपण काय बोलतो, याचं भान नाही असं असूच शकत नाही. आपल्या विधानांमुळे उद्या काय होणार, याची त्यांना पूर्ण कल्पना असूनही ते असं बिनधास्तपणे का बोलताहेत? या अनुषंगाने आज विविध माध्यमात बरीच चर्चा झाली. या चर्चेतील काही कोन समजून घ्यायला हवेत.**

# भिडे अशी विधानं करून काय साधताहेत?

'कुंकू लाव मग तुझ्याशी बोलतो', असं एका महिला पत्रकाराला बोलून उठवून दिलेली राळ असो किंवा '१५ ऑगस्ट हा भारताचा खरा स्वातंत्र्य दिन नाही', असं म्हणून पेटवलेला वाद असो... आणि आता 'करमचंद गांधी हे मोहनदास यांचे खरे वडील नसून ते त्याच मुस्लीम जमीनदाराचे पुत्र आहेत.' हे गांधीबद्दल केलेलं अपमानास्पद विधान असो... संभाजी भिडे हे सगळं बिनदिक्कतपणे बोलताहेत. त्यांच्या या विधानानंतर राजकारण, समाजकारण सगळीकडे नुसता प्रतिक्रियांची आग लागते. जो तो आपापल्या परीनं संभाजी भिडेंच्या विरोधात आणि काहीतर त्यांच्या बाजूनंही तावातावानं बोलताना दिसतात. यावेळी गांधींच्या विधानावरून तर विधानसभेतही राडा झालाय. अटकेची मागणी होतेय. गुन्हा दाखल झालाय. पण तरीही अद्याप सत्ताधारी आघाडीकडून याची चौकशी करू, कारवाई होईल अशी आश्वासनच सुरू आहेत. ही सगळी



वादग्रस्त विधानं आज जाहीरपणे होत असली, तरी कुजबुज आघाडीमधे ही विधानं काही नवी नाहीत. आजवर गांधीजींच्या बदनामीचा सर्वतोपरी प्रयत्न झालाय. पण आता तो भर सभेमधून होऊ लागलाय. यामागे निश्चितपणे नियोजन आहे. हे सगळं काही आपोपाप, स्वाभाविकपणे होत नाही. संभाजी भिडे यांच्या प्रत्येक विधानानंतर ज्या पद्धतीच्या प्रतिक्रिया उमटल्यात, त्यावरून समाजाचं ध्रुवीकरण करायचंय एवढं तर निश्चितपणे स्पष्ट दिसतंय. समाजात जेवढी फोडाफोडी करता येईल तेवढी ती करायची, प्रसंगी दंगली पेटल्या तरी चालतील पण लोकांमधे दुही माजली पाहिजे, याची पुरती काळजी घेतली जातेय. गांधींबद्दल संभाजी भिडे यांनी केलेलं विधान हे किती अपमानास्पद आणि गलिच्छ आहे हे तपासायला काय कायदेशीर चौकशी करण्याची गरज आहे का?

तरीही सत्ताधारी आघाडीतील एकाही नेत्याकडून या विधानाचा स्पष्ट शब्दात निषेध झालेला नाही. गुळमुळीत विधानं करून, चौकशी करू, कारवाई होईल अशा भाषेत सारवासारव केली जाते आहे. हे सगळं पाठीशी घालणं नाही, असं सत्ताधाऱ्यांना वाटत असलं तरीही लोकांना ते कळत नाही, असं नाही. कोल्हापूरातील दंगल असो किंवा मणिपूरमधे चाललेला हिंसाचार असो सर्वत्र दुहीचं राजकारण पेटवायचं, हेच या सगळ्यामागचं मुख्य कारण वाटतं. भिडेंच्या या विधानाबद्दल गांधीजींची पणतू तुषार गांधी यांची प्रतिक्रिया महत्त्वाची आहे. ते म्हणतात की, संभाजी भिडे जे बोलले, ते घृणास्पद होतंच, पण त्यांच्यासमोर बसलेल्या प्रेक्षकांनी हसून त्या विधानाचं समर्थन करणं अधिक घृणास्पद होतं.

## ।। अभंगवाणी ।।



सर्व सुख आम्ही भोगूं सर्व काळ ।
तोडियेलें जाळ मोहपाश ॥१॥

याचसाठी सांडियेले भरतार ।
रातलों या परपुरुषाशीं ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मिले सूर मेरा तुम्हारा!

## » आम्ही तिघांनी ठरवलं तर महाराष्ट्रात काही होईल

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादीत फूट पडल्यानंतर पहिल्यांदाच महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे तीन नेते पहिल्यांदाच एकत्र आल्याचं पाहायला मिळाले. यावेळी बोलताना शरद पवार यांनी एक सूचक वक्तव्य केले.**

या ठिकाणी उद्धव ठाकरे, बाळासाहेब थोरात आणि मी असून आम्ही तिघांनी ठरवलं तर महाराष्ट्रात कदाचित काही होईल आणि याच्यामध्ये वेगळे सांगायची गरज नाही, असे वक्तव्य शरद पवारांनी केले. पवारांच्या या विधानाची राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे. कारण शरद पवारांचे प्रत्येक विधान राज्याच्या राजकारणात महत्त्वाचं मानलं जातं.

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे आयोजित 6 ऐतिहासिक ग्रंथांच्या प्रकाशन सोहळ्यासाठी राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि कॉंग्रेसचे विधिमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात उपस्थित आहेत. मुंबईतील वाय.बी. चव्हाण सेंटर येथे हा कार्यक्रम पार पडला.



इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे या सारख्या संस्थांना आपल्याकडून प्रोत्साहन देण्याची गरज आहे. सध्याच्या राजकीय स्थितीत आपल्याला सरकारशी बोलणं अडचणीचं जात आहे. सध्याच्या स्थितीतून आज किंवा उद्या काही तरी मार्ग निघतील आणि जेव्हा हे घडलं त्यावेळी सरकारला मदत करायला भाग पाडणं अडचणीचं ठरणार नाही, असेही शरद पवार म्हणाले. उद्धव ठाकरे, बाळासाहेब थोरात आणि मी इथं असून आम्ही तिघांनी ठरवलं तर महाराष्ट्रात कदाचित काहीही होऊ शकतं असं म्हणत शरद पवार यांनी सध्याच्या महाराष्ट्राच्या राजकारणावर सूचक भाष्य केलं असल्याची चर्चा रंगली. उद्धव ठाकरे ज्या काळात मुख्यमंत्री होते त्या काळात देखील आम्ही त्यांच्या सरकारकडून दोन कामं करुन घेतली होती. संस्थांना मदत करण्याची गरज त्या सरकारच्या काळात पूर्ण केली होती तशीच मदत आज होण्याची गरज असल्याचं शरद पवार म्हणाले. दरम्यान, इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ही संस्था चांगलं काम करत असून या संस्थेचं काम सुरु ठेवलं पाहिजे, असंही शरद पवार म्हणाले.

### वैद्यकीय कर्मचारी कोणत्या जातीचे होते?

» दिल्लीला कसे पाणी पाजायचे, हे छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्याला इतिहासातून दाखवून दिले आहे, त्यातून आजच्या काळात प्रेरणा घेण्याची गरज आहे, असे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे. दरम्यान उद्धव ठाकरे पुढे बोलताना म्हणाले की, आपण इतिहासातून प्रेरणा घेण्याची गरज आहे, तसेच महाराष्ट्राला इतिहास आहे असे वक्तव्य मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये एका कार्यक्रमात केले आहे.

## अशोक भाईंच्या रुपाने मला देवच भेटला!

# अन् माझ्या जगण्याचं सोनं झालं!

## » ज्येष्ठ रंगकर्मी हरीष करदेकर यांनी व्यक्त केली कृतज्ञता

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**सेटिंग, प्रॉपर्टी, कपडे पट, पार्श्वसंगीत रेकॉर्ड ऑपरेटिंग आणि सोबत छोट्या छोट्या भूमिका अशी कामे १९६९ ते ९० पर्यंत केली. सुरुंग, वादळ, डॉक्टर लागू , झपाटलेली, डार्लिंग डार्लिंग, बोल राधा बोल, हमिदाबाईची कोठी, मवाली अश्वमेघ, अजून यौवनात मी, आकाश पेलताना, दुभंग आदि नाटकांचे जवळपास साडेपाचहजाराहून अधिक प्रयोग केले, असे प्रतिपादन नाट्यकलावंत हरीष रामचंद्र करदेकर यांनी केले.**




करदेकर यांचा सन्मान नटश्रेष्ठ अशोक सराफ व डॉ. संजय पैठणकर यांच्या हस्ते करण्यात आला. त्या प्रसंगी ते बोलत होते.

हरीष करदेकर यांचे मनोगत सूत्रसंचालक अभिनेते अतुल परचुरे यांनी वाचून दाखवले. 'माझा देव मला भेटला १९७४ ला, त्याने आमचं लग्न लावून दिलं, असा अशोक सराफ आमचा भाई! त्यांनी व मी कामाची सुरवात १९६९ पासून केली, मला माझ्या कामानिमित्त अनेक माणसं भेटली खूप अनुभवलं, त्यावर 'चौथा अंक' हे पुस्तक लिहितोय, ही माझी मानवंदना!'

कृतज्ञ मी... कृतार्थ मी या कार्यक्रमात नटश्रेष्ठ अशोक सराफ यांच्यावतीने नाट्य क्षेत्रातील विष्णू जाधव, सुरेंद्र दातार, बाबा पार्सेकर, सीताराम कुंभार, प्रकाश बुद्धिसागर, वसंत इंगळे, दिप्ती भोगले, उपेंद्र दाते, नंदलाल रेळे आदी २० रंगमंच कलाकार, तंत्रज्ञ, रंगमंचामागील कलाकारांच्या सन्मानाचे आयोजन दादरच्या स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृहात करण्यात आले होते!

मागील वर्षी ४ जून रोजी नटश्रेष्ठ अशोक सराफ यांनी वयाची पंचाहत्तर वर्षे पूर्ण केली. त्यानिमित्त त्यांच्या अभिनय कारकिर्दीचे कथन 'मी बहुरूपी' या पुस्तकाद्वारे प्रसिद्ध झाले.

त्यासाठी लाभलेले प्रायोजकत्व निधीचा विनियोग रंगमंच तंत्रज्ञ, कलावंत अशा वयोवृद्ध कलाकारांचा त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता सन्मान करण्यासाठी करावा, अशी इच्छा अशोक आणि निवेदित सराफ यांनी व्यक्त केली होती. त्यानुसार या कार्यक्रमाचे आयोजन अशोक सराफ, निवेदिता सराफ व सुभाष सराफ यांच्यावतीने ग्रंथालीच्या सहकार्याने करण्यात आले होते.

### संगीत नाटकांबद्दल कृतज्ञता

» याप्रसंगी सारस्वत बँकेचे अध्यक्ष गौतम ठाकूर, अल्कोन इंटरप्राईजेसचे अनिल खवटे, दुबईचे प्रख्यात डॉक्टर संजय पैठणकर आणि अशोक सराफ यांचे हस्ते रंगकर्मींचा सन्मान करण्यात आला! निवेदिता सराफ,सुभाष सराफ, ग्रंथालीचे संस्थापक दिनकर गांगल, विश्वस्त सुदेश हिंगलासपुरकर यांचे प्रमुख उपस्थितीत हा सोहळा उत्साहात पार पडला. याप्रसंगी मराठी नाट्यपरंपरेचे मूळ असलेल्या संगीत नाटकांबद्दल कृतज्ञता म्हणून नाट्यपदे मानसी फडके-केळकर व श्रीरंग भावे यांनी सादर केली. संगिताची साथ साई बँकर, निरंजन लेले यांनी केली. संहिता अरुण जोशी यांची होती. तर अतुल परचुरे व डॉ. मृण्मयी भजक कार्यक्रमाचे रेखीव सूत्रसंचालन केले.

# सैन्यात शिस्तच सर्वोच्च!

## » जास्त रजेमुळे जवान बडतर्फ : सुप्रीम कोर्टाचा निर्णय

| नवी दिल्ली |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सर्वोच्च न्यायालयाने लष्करातील शिस्त सर्वात महत्त्वाची असल्याचे म्हटले आहे. एका जवानाची याचिका फेटाळताना न्यायालयाने हे सांगितले. जास्त रजा घेतल्याने या जवानाला लष्करातून काढून टाकण्यात आले होते. न्यायालयाने म्हटले - सैनिकाने लष्कराची शिस्त मोडली आहे. जवानाला आधी 39 दिवस आणि नंतर 30 दिवसांची सुट्टी देण्यात आली. यानंतरही जवान सामील झाला नाही. यानंतर लष्कराने कारवाई करत त्याला बडतर्फ केले.**



4 जानेवारी 1983 रोजी एका व्यक्तीची सैन्यात वाहतूक चालक म्हणून भरती झाली. या चालकाने 1998 मध्ये 8 नोव्हेंबर ते 16 डिसेंबर या कालावधीत 39 दिवस सुट्टी घेतली होती. घरची परिस्थिती ठीक नसताना त्यांनी 17 डिसेंबर ते 15 जानेवारी 1999 अशी आणखी 30 दिवसांची रजा घेतली.

त्यानंतरही तो रुजू झाला नाही. 15 फेब्रुवारी 1999 रोजी लष्करी कायदा (कलम 106) अंतर्गत जवानावर कोर्ट ऑफ इन्क्वायरी झाली, ज्यामध्ये तो दोषी ठरला आणि त्याला कोर्ट मार्शल करण्यात आले.

यानंतर त्यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. शिपायाने सांगितले की, त्याच्या पत्नीची तब्येत खूप खराब होती, त्यामुळे त्याने जास्त रजा घेतली. न्यायमूर्ती हिमा कोहली आणि न्यायमूर्ती राजेश बन्सल यांनी त्यांना वैद्यकीय अहवाल दाखवण्यास सांगितले असता, त्यांची पत्नी गंभीर आजारी असून तिला पतीची गरज असल्याचे दाखवणारे कोणतेही कागदपत्र त्यांच्याकडे नव्हते.

यानंतर सुप्रीम कोर्टाने जवानाचे अपील पुराव्याअभावी फेटाळले. लष्करात कोणत्याही प्रकारच्या अनुशासन हीनतेला परवानगी नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे. भाजपा किसान मोर्चा देवरिया तर्फे कारगिल विजय दिवसाच्या 24 व्या वर्धापन दिनानिमित्त सैनिक पुनर्वसन कल्याण केंद्रातील अमर जवान स्मारकावर पुष्पहार अर्पण करून कारगिल शहिदांचे स्मरण करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून उत्तर प्रदेश सरकारच्या मंत्री विजयालक्ष्मी गौतम उपस्थित होत्या.

### लष्कराने कारवाई करत केले बडतर्फ

» जवानाला आधी 39 दिवस आणि नंतर 30 दिवसांची सुट्टी देण्यात आली. यानंतरही जवान सामील झाला नाही. यानंतर लष्कराने कारवाई करत त्याला बडतर्फ केले. 4 जानेवारी 1983 रोजी एका व्यक्तीची सैन्यात वाहतूक चालक म्हणून भरती झाली. या चालकाने 1998 मध्ये 8 नोव्हेंबर ते 16 डिसेंबर या कालावधीत 39 दिवस सुट्टी घेतली होती.

# दिल्लीत मोहरमच्या मिरवणुकीत हिंसाचार

## » 12 जखमी, जमावाने कारच्या खिडक्या फोडल्या...

| नवी दिल्ली |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**शनिवारी संध्याकाळी दिल्लीच्या नांगलोई भागात मोहरमच्या मिरवणुकीत हिंसाचार झाला. पोलिसांनी ताजियाला ठरलेल्या मार्गापेक्षा वेगळ्या मार्गाने बाहेर काढण्यास नकार दिला. त्यामुळे जमावाने दगडफेक सुरू केली. हिंसक जमावाने रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनांना लक्ष्य केले. गाडीच्या काचा फोडल्या. बसवर दगडफेक केली. याचे अनेक व्हिडिओ सोशल मीडियावर समोर आले आहेत.**



पोलिस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, चकमकीत सहा पोलिसांसह १२ जण जखमी झाले असून अनेक वाहनांचे नुकसान झाले आहे. डीसीपी आऊटर हरेंद्र सिंह यांनी सांगितले की, ही घटना शनिवारी सायंकाळी ६ वाजता घडली. नांगलोई परिसरात अनेक ताजिया मिरवणुका काढल्या जात होत्या आणि त्यात सुमारे 10,000 लोक सहभागी झाले होते. त्यामुळे रोहतक रस्त्यावरील काही लोकांनी ताजियाला ठरलेल्या मार्गापेक्षा वेगळ्या मार्गाने नेण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी नकार दिल्याने काही हल्लेखोर हिंसक झाले. या घटनेचे काही कथित व्हिडिओ सोशल मीडियावर समोर आले आहेत. व्हिडिओमध्ये, परिसरातील काही लोक दगडफेक करताना, बस आणि खासगी कारसह सार्वजनिक वाहनांचे नुकसान करताना दिसत आहेत. ते रस्त्यावर धावताना आणि वाहनांवर हल्ला करताना दिसले.

एका व्हिडिओमध्ये पोलिस लाठीचार्ज करताना दिसत आहेत, तर दुसऱ्या व्हिडिओमध्ये बसमध्ये बसलेले प्रवासी दगडफेक टाळण्यासाठी जमिनीवर बसलेले दिसत आहेत. कारमध्ये बसलेल्या महिलेचा व्हिडिओही समोर आला आहे. ज्यात जमावाने दगडफेक करून विंडस्क्रीन तोडला.

### पोलिसांना लाठीचार्ज करावा लागला

शनिवारी संध्याकाळी दिल्लीच्या नांगलोई भागात मोहरमच्या मिरवणुकीत हिंसाचार झाला. पोलिसांनी ताजियाला ठरलेल्या मार्गापेक्षा वेगळ्या मार्गाने बाहेर काढण्यास नकार दिला. त्यामुळे जमावाने दगडफेक सुरू केली. डीसीपी पुढे म्हणाले, जमावाने पोलिसांवर दगडफेक केली. रस्त्यावरून चालणाऱ्या पादचाऱ्यांनाही लक्ष्य करण्यात आले. पोलिसांनी सौम्य लाठीमार करून बेशिस्त जमावाला पांगवले आणि तात्काळ व्यवस्था पूर्ववत झाली. परिसरातील परिस्थिती नियंत्रणात असून दोषींवर कायदेशीर कारवाई केली जाईल, असेही ते म्हणाले.

# एल्विश यादववर सलमान संतापला

सलमान खानने एल्विश यादवला खडसावले आहे. त्याने एल्विशला त्याच्या फॉलोअर्सची संख्या विचारली. सलमान इतका संतापला की त्याने शोच्या मध्यभागी एल्विशच्या आईला व्हिडिओ कॉल केला. आईला पाहून एल्विश रडू लागला.

खरं तर, एल्विशने शोमधील आणखी एक स्पर्धक बेबिकाला शिवीगाळ केली होती. एल्विशच्या या कृत्याचा सलमानला खूप राग आला होता. त्याने एल्विशकडे बोट दाखवत सांगितले की, तुमचे कितीही फॉलोअर्स असले तरी शोमध्ये गैरप्रकार खपवून घेतले जाणार नाहीत. त्यामुळे प्रेक्षकसंख्या कमी झाली तर काही हरकत नाही, असे सलमानने सांगितले.



सलमान खान दर शनिवारी आणि रविवारी बिग बॉसच्या स्पर्धकांसोबत प्रश्नोत्तरे करतो. यादरम्यान, तो शोच्या स्पर्धकांसाठी वर्गही घेतो. यावेळी त्याचे लक्ष्य होते एल्विश यादव. सलमानने एल्विशला फटकारले आणि म्हणाला- तुझे किती फॉलोअर्स आहेत, हे सर्व करून तुझे फॉलोअर्स वाढवायचे की कमी करायचे?

तुम्ही चांगला कंटेंट तयार केलात तर लोक तुम्हाला पसंत करतील पण तुम्ही हे सर्व केले तर तुमचे नुकसान होईल. सलमानने एल्विशला विचारले की त्याचे फॉलोअर खरे आहेत की विकत घेतले आहेत. उत्तरात, एल्विश म्हणतो की त्याचे सर्व फॉलोअर खरे आहेत.

तेव्हा सलमान म्हणाला- तुम्ही एक काम करा. तुमच्या चाहत्यांच्या सैन्यात सामील होण्यासाठी 500 रुपये घेणे सुरू करा. मग बघा किती लोक तुमच्याशी कनेक्ट होतात.

# कंगनाच्या नावाने फेक अकाउंट



कंगना रनोटने अलीकडेच सोशल मीडियावर तिच्या चाहत्यांना आणि फॉलोअर्सला इशारा दिला आहे की काही लोक तिच्या नावाचा गैरवापर करत आहेत. रिपोर्ट्सनुसार, कंगनाने म्हटले आहे की, सोशल मीडियावर लॉरा नावाचे अकाउंट ऑपरेट केले जात आहे. हे अकाउंट कंगनाच्या ऑनलाइन मॅनेजर बनून तिच्या चाहत्यांना मेसेज करत आहे. कंगनाच्या मते यामागे चंगु-मंगू गँग आणि फिल्म माफिया आहेत. कंगनाने मुंबई सायबर क्राइम ब्रँचला या प्रकरणाची चौकशी करण्याची विनंतीही केली आहे. एका मेसेजचा स्क्रीनशॉट शेअर करत कंगनाने लिहिले - आज मला कळले की फिल्म माफिया माझ्या नावाने फेक अकाउंट चालवत आहेत. वास्तविक, कंगनाच्या चाहत्यांना जो मेसेज शेअर केला जात आहे त्यात असे लिहिले आहे– कंगना रनोटच्या व्हेरिफाईड अकाऊंटवरील लाईक्स आणि कमेंट्च्या आधारे तुमची निवड करण्यात आली आहे.कंगनाला तुमच्या टिप्पण्या आवडतात आणि तिला तुमच्याशी बोलायचे आहे. मी कंगनाची ऑनलाइन मॅनेजर लॉरा आहे. तुम्हाला त्यांच्याशी बोलायचं आहे का? जर तुम्हाला ही ऑफर आवडली असेल, तर खालील लिंकवर क्लिक करून मला तुमचे मत कळवा.

# रॉकी-राणीची बंपर कमाई

रॉकी आणि राणीच्या प्रेमकथेने रिलीजच्या दुसऱ्या दिवशी म्हणजेच शनिवारी 16 कोटी रुपयांची कमाई केली आहे. दोन दिवसांत चित्रपटाचे एकूण कलेक्शन 27.10 कोटी रुपये झाले आहे. ही चित्रपटासाठी चांगली सुरुवात म्हणता येईल. कोणतीही सुटी नसतानाही या चित्रपटाने दोन दिवसांत चांगली कमाई केली आहे. आज म्हणजेच रविवारी चित्रपटाच्या कलेक्शनमध्ये मोठी झेप पाहायला मिळते. इंडस्ट्री ट्रॅकर SACNILK नुसार, चित्रपटाने दुसऱ्या दिवशी 16 कोटींची कमाई केली आहे. त्याचवेळी, चित्रपटाने पहिल्या दिवशी 11.10 कोटींची ओपनिंग घेतली. या चित्रपटाला प्रेक्षकांचा प्रतिसाद सकारात्मक आहे. करण जोहरचा हा फॅमिली ड्रामा चित्रपट लोकांना आवडला आहे. रविवारी चित्रपटाच्या कमाईत आणखी वाढ होऊ शकते. रविवारची सुटी आणि वर्ड ऑफ माऊथ पब्लिसिटीमुळे हा चित्रपट 18 ते 20 कोटींची कमाई






करू शकेल असा अंदाज आहे. अशा प्रकारे चित्रपट पहिल्या वीकेंडला 40 कोटींहून अधिक कमाई करेल. रॉकी आणि राणीच्या प्रेमकथेला ओपेनहायमर आणि बार्बी यांनी विशेष नुकसान पोहोचवले नाही. भारतीय बॉक्स ऑफिसवर आता ओपेनहायमरचा वेग मंदावला आहे. शनिवारी 7.25 कोटी जमा झाले. बार्बी आणि ओपेनहाइमर हे मल्टिप्लेक्स आणि अर्बन ओरिएंटेड चित्रपट आहेत. कौटुंबिक चित्रपट असल्याने रॉकी आणि राणीची प्रेमकहाणी प्रेक्षकांना आकर्षित करत आहे.



# साराने केला रणवीरसोबतचा फोटो शेअर

रणवीर सिंह आणि आलिया भट्ट स्टारर चित्रपट रॉकी और रानीची लव्हस्टोरी रिलीज झाली आहे. आतापर्यंत या चित्रपटाने 27.10 कोटींची कमाई केली आहे. नुकतेच सारा अली खानने रणवीर सिंहसोबतचे काही फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत.

वास्तविक, साराने या चित्रपटात रणवीर सिंहसोबत छोटी भूमिका केली आहे. साराने रणवीर सिंहसोबत चित्रपटाच्या परिचयात्मक गाण्यात - हार्टथ्रोब डान्स केला आहे. सारा अली खानने सोशल मीडियावर फोटो शेअर करत लिहिले - मेरा सिम्बा सबका रॉकी! या पोस्टवर रणवीर सिंहने कमेंटही केली आहे. त्याच वेळी, साराचा भाऊ इब्राहिम अली याने चित्रपटाचा



सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम केले. साराने 2018 मध्ये रोहित शेट्टीच्या कॉप-कॉमेडी चित्रपट सिम्बामधून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. या चित्रपटात साराच्या विरुद्ध रणवीर होता. या चित्रपटात रणवीरने गोव्याच्या पोलीस अधिकाऱ्याची भूमिका साकारली होती. रणवीर-सारा यांनी 90 च्या दशकातील लोकप्रिय गाण्याच्या 'आंख मारे'च्या रिक्रिएट व्हर्जनवर डान्स केला. रॉकी आणि राणीच्या प्रेमकथेमध्ये रणवीर-आलियासोबत धर्मेंद्र, जया बच्चन, शबाना आझमी यांच्याही भूमिका आहेत.

# महाराष्ट्राची गोल्डन हॅट्रिक

## » पोलिस कुस्ती स्पर्धेत चौधरी, आवारे, यादव यांना सुवर्ण

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**कॅनडा येथील विनिपेग येथे आयोजित वर्ल्ड पोलिस आणि फायर गेम्स या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र पोलिस दलाच्या खेळाडू अधिकाऱ्यांनी ऐतिहासिक कामगिरी केली आहे. कुस्ती स्पर्धेत विजय चौधरी, राहुल आवारे, नरसिंग यादव यांनी आपापल्या वजन गटामध्ये सुवर्ण पदक पटकावले आहे. पोलिस आणि अग्निशमन दलासाठी या स्पर्धेचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.**



महाराष्ट्राचे हे तीनही मल्ल महाराष्ट्र पोलिस दलात उच्च पदावर कार्यरत असून तिघांनीही या वर्षीच्या अखिल भारतीय पोलिस गेम्समध्ये सुवर्णपदक मिळवले आहे. नरसिंह यादव यांनी भारताचे प्रतिनिधीत्व करताना राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक, राष्ट्रकुल कुस्ती स्पर्धेत रौप्यपदक, आशियाई क्रीडा स्पर्धेत कांस्यपदक तर आशियाई कुस्ती स्पर्धेत एक सुवर्ण आणि दोन कांस्यपदकाची कमाई केली आहे. तसेच त्यांनी वरिष्ठ जागतिक कुस्ती स्पर्धेत कांस्य मिळवले होते.

तसेच त्यांनी महाराष्ट्राच्या कुस्ती क्षेत्रातील सर्वात मानाच्या महाराष्ट्र केसरीचे विजेतपद पहिल्यांदा सलग तीनवेळा मिळविले आहे. राहुल आवारे यांनी भारताचे प्रतिनिधित्व करताना राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक, राष्ट्रकुल कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक, आशियाई कुस्ती स्पर्धेत तीनवेळा कांस्यपदक तसेच वरिष्ठ जागतिक कुस्ती स्पर्धेत त्यांनी कांस्यपदक मिळवले आहे. ते सध्या आंतरराष्ट्रीय कुस्ती संकुल पुणे येथे अर्जुन अवॉर्डी काकासाहेब पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतात.

### विजय चौधरी सर्वोच्च महाराष्ट्र केसरी

» विजय चौधरी यांनी महाराष्ट्राच्या कुस्ती क्षेत्रातील सर्वोच्च असा महाराष्ट्र केसरी किताब सलग तिन वेळा पटकावला आहे. त्याच बरोबर ऑल इंडिया विद्यापीठ स्पर्धेत त्यांनी दोनवेळा कांस्यपदक मिळवले आहे. ते हिंद केसरी पै.रोहित पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली मामासाहेब मोहोळ कुस्ती संकुल पुणे येथे सराव करतात.

# द्रविडकडून रणनीतीचा बचाव

## » विराट-रोहित खेळले तर, उत्तरे मिळाली नसती

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**टीम इंडियाचा मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविडने वेस्ट इंडिजविरुद्धच्या वनडे मालिकेत प्रयोग करण्याच्या रणनीतीचा बचाव केला. दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात विराट कोहली आणि रोहित शर्मासारख्या वरिष्ठ खेळाडूंशिवाय खेळताना भारतीय संघाला 6 गडी राखून पराभव स्वीकारावा लागला. यावर तो म्हणाला, 'आम्ही रोहित-विराटला खेळू दिले असते तर विश्वचषकपूर्वी प्लेइंग-11 संबंधित प्रश्नांची उत्तरे मिळू शकली नसती.'**



### शुभमन गिलच्या स्कोअरची चिंता नाही

'मला शुभमनची फारशी चिंता नाही, तो चांगली फलंदाजी करत आहे. प्रत्येक सामन्यानंतर आपण त्याच्या फॉर्मबद्दल बोलू शकत नाही, अशा गोष्टी घडतात. परिस्थितीही तितकी सोपी नव्हती. शुभमन चांगली फलंदाजी करत आहे, तिन्ही फॉरमॅटमध्ये तो संघाचा महत्त्वाचा भाग आहे. त्रिनिदादमध्ये तो चांगली कामगिरी करेल अशी आशा आहे.

द्रविड म्हणाला, 'आमचे लक्ष सध्या आशिया चषक आणि विश्वचषकावर आहे, संघ तिसऱ्या वनडेतही प्रयोग करण्यापासून मागे हटणार नाही. भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील 3 वनडे मालिका 1-1 अशी बरोबरीत आहे. तिसरा एकदिवसीय सामना 1 ऑगस्ट रोजी सॅन फ्रान्सिस्को येथे खेळवला जाईल.

'विश्वचषकपूर्वी खेळाडूंना आजमावण्याची ही शेवटची संधी आहे. आमचे काही खेळाडूही जखमी आहेत, जे एनसीएमध्ये आहेत. पुढील महिन्यापासून आशिया चषक आणि त्यानंतर विश्वचषक स्पर्धा सुरू होईल. आमच्याकडे जास्त वेळ नाही, आशिया चषक आणि विश्वचषकापूर्वी काही खेळाडू तंदुरुस्त होतील अशी आम्हाला आशा आहे. पण आम्ही त्यांच्यासोबत चान्स घेऊ शकत नाही, जर ते फिट झाले नाही तर आम्हाला बाकीच्या खेळाडूंसोबत जावे लागेल.

त्यामुळे बेंचवर बसलेल्या खेळाडूंना खेळासाठी वेळ देणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये खेळाडूंना आजमावून पाहिल्यास त्यांच्याबद्दलही माहिती मिळते. आशिया चषकापूर्वीची ही आमची शेवटची मालिका आहे. विराट आणि रोहितला खेळू दिले असते तर आम्हाला संघासमोरील प्रश्नांची उत्तरे मिळू शकली नाहीत. विराट आणि रोहितसारख्या खेळाडूंना अनेकवेळा बसवून नवीन खेळाडू आजमावण्याची जोखीम पत्करावी लागते.

# सेदिकुल्लाहचे एका षटकात 7 षटकार

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

काबूल प्रीमियर लीग 2023च्या 10व्या सामन्यात अफगाणिस्तानच्या सेदिकुल्लाह अटलने एका षटकात 7 षटकार ठोकले. या स्पर्धेतील 10वा सामना शाहीन हंटर्स आणि अबसिन डिफेंडर्स यांच्यात 29 जुलै (शनिवार) रोजी अयोबी क्रिकेट स्टेडियम, काबूल येथे खेळवला जाईल.

या सामन्यात आबासिन डिफेंडर्सने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. या सामन्यात शाहीन हंटर्सचा कर्णधार सेदिकुल्लाह अटलने 56 चेंडूंत सात चौकार आणि 10 षटकारांच्या मदतीने नाबाद 118 धावा केल्या.

शाहीन हंटर्सच्या डावातील 19व्या षटकात अटलने अमीर जझाईच्या चेंडूवर एकूण सात षटकार ठोकले. त्या 19व्या षटकात एकूण 48 धावा आल्या.

शाहीन हंटर्सने 20 षटकांत 6 बाद 213 धावा केल्या. प्रत्युत्तरात आबासिन डिफेंडर्सचा संघ 18.3 षटकांत सर्वबाद 121 धावांत आटोपला. हंटर्स 92 धावांनी विजयी झाले. ओव्हरचा पहिला चेंडू नो बॉल होता, ज्यावर अटलने षटकार मारला. यानंतर पुढचा चेंडू वाईड झाला. जाझाईने पुढच्या सहा चेंडूंवर सलग सहा षटकार ठोकले.

भारतीय फलंदाज ऋतुराज गायकवाडनेही एका षटकात सात षटकार मारण्याचा चमत्कार केला आहे. 2022-23 विजय हजारे ट्रॉफीमध्ये त्याने एका षटकात सात षटकार मारले.

या स्पर्धेचा उपांत्यपूर्व सामना महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेश यांच्यात झाला. शिवा सिंगच्या चेंडूवर गायकवाडने हा पराक्रम केला होता. या षटकात त्याने नो बॉलवरही षटकार खेचला होता.